# All India Mock test for MPSC Gr B Prelims- Marathi

**Q1.** खालीलपैकी योग्य विधाने ओळखा .

**A.** ट्रिटियम मध्ये 2 प्रोटॉन व दोन न्यूट्रॉन असतात.

**B.** ट्रिटियम हे कार्बनचे सम स्थानिक आहे

(a) फक्त A योग्य

(b) फक्त B योग्य

(c) दोन्ही योग्य

(d) दोन्ही अयोग्य

**Q2.** खालीलपैकी अयोग्य विधान ओळखा .

**A.** इका बोरॉन या भाकीत केलेल्या मूलद्रव्याला आधुनिक आवर्त सारणीत गॅलियम असे नाव देण्यात आले आहे.

**B.** एका सिलिकॉन या भाकीत केलेल्या मूलद्रव्याला आधुनिक आवर्त सारणीत स्कँडियम असे नाव देण्यात आले आहे.

**C.** आधुनिक आवर्त सारणी हेनरी मोस्ले या शास्त्रज्ञाने तयार केली.

(a) A आणि B

(b) B आणि C

(c) फक्त C

(d) ABC

**Q3.** 400 वॅट चे एक लेथ मशीन प्रतिदिन एक तास चालवले जाते. जर एका युनिट चा दर 4 रुपये असेल तर जानेवारी महिन्यात त्या मशीनसाठी वापरलेल्या विजेचा खर्च किती?

(a) 49.6 रुपये

(b) 496 रुपये

(c) 50.6 रुपये

(d) 506 रुपये

**Q4.** खालीलपैकी योग्य विधान ओळख.

**A.** झेप्टो म्हणजे $10^{-24}$

**B.** झेट्टो म्हणजे $10^{24}$

(a) फक्त A योग्य

(b) फक्त B योग्य

(c) दोन्ही योग्य

(d) दोन्ही अयोग्य

**Q5.** खालीलपैकी कोणत्या वैज्ञानिकाने अवरक्त किरणांचा शोध लावला?

(a) चॅडविक

(b) रिटर

(c) हर्शेल

(d) टेलर

**Q6.** खालीलपैकी योग्य विधान ओळखा .

**A.** फिलेरीयासिस हा रोग कर्नाटकातील विशिष्ट तीन जिल्ह्यात आढळून येतो.

**B.** हा रोग ऍनाफिलीस डासाची मादी चावल्यामुळे होतो.

**C.** या रोगासाठी रक्त चाचणी करण्याकरता रात्री 10 ते पहाटे 2 हि योग्य वेळ आहे

(a) फक्त A

(b) फक्त B

(c) फक्त C

(d) ABC

**Q7.** खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.

**A.** थ्रॉम्बोप्लास्टीन, प्रोथ्रॉम्बिन आणि कॅल्शियम यांचा संयोग होऊन थ्रॉम्बिन तयार होते.

**B.** थ्रॉम्बिन आणि फायब्रिन संयोग होऊन फिब्रिनोजीन तयार होते.

(a) फक्त A योग्य

(b) फक्त B योग्य

(c) दोन्ही योग्य

(d) दोन्ही अयोग्य



**Q8.** खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा.

**A.** सामान्यतः लाल रक्तपेशींचा आकार व्दिबहिर्वक्र असतो.

**B.** रक्त गोठण्याची क्रिया सुरु करण्याचे कार्य रक्तपट्टिका करतात.

**C.** मानवी शरीरात जवळ जवळ 97000 किमी लांबीच्या रक्तवाहिन्या असतात.

(a) A आणि B

(b) B आणि C

(c) A आणि C

(d) A B C

**Q9.** खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा .

**A.** प्रत्येक मनुष्य दररोज श्वसनाद्वारे सरासरी 10 ते 20 किलो हवा श्वसन करतो.

**B.** कोळी त्याचे श्वसन त्वचेमार्फत करतो.

**C.** सामान्यतः किडनीतून साखरेचे गाळण होत नाही.

(a) फक्त A

(b) फक्त B

(c) फक्त C

(d) ABC

**Q10.** हिपॅरिनची निर्मिती खालीलपैकी कोणत्या अवयवात होते?

(a) मूत्रपिंड

(b) स्वादुपिंड

(c) जठर

(d) यकृत

**Q11.** योग्य विधाने ओळखा .

**A.** चॅटन या शास्त्रज्ञाने सजीवांचे दोन प्रकारात विभाजन केले.

**B.** कोपलॅंड या शास्त्रज्ञाने सजीवांचे तीन प्रकारात वर्गीकरण केले.

**C.** व्हिटकर या शास्त्रज्ञाने सजीवांचे पाच प्रकारात विभाजन केले

(a) AB

(b) BC

(c) AC

(d) ABC

**Q12.** खालीलपैकी कोणत्या वैज्ञानिकांनी जीवाणुंच्या पेशीत DNA द्वारे तयार होणाऱ्या प्रथिन संश्लेषणाच्या प्रक्रियेची प्रतिकृती तयार केली?

(a) व्हॉल्टर आणि सटन

(b) एव्हरी आणि मॅक्लॉइड

(c) जेकब आणि मोनोड

(d) यापैकी नाही

**Q13.** खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.

**A.** अधीवृषण नलिकेची लांबी सहा मीटर पर्यंत असते

**B.** एका शुक्राणूची लांबी 100 मायक्रोमीटर एवढी असते.

**C.** शुक्राणूला ऊर्जा पुरवण्यासाठी रेतामध्ये सुक्रोज नावाची शर्करा असते.

(a) फक्त A बरोबर

(b) फक्त B बरोबर

(c) फक्त C बरोबर

(d) ABC बरोबर

**Q14.** जोड्या लावा

| | |
|---|---|
| **A.** रंध्रीय प्राणी संघ | 1. फुलपाखरू |
| **B.** निडारिया प्राणी संघ | 2. सायकॉन |
| **C.** संधिपाद प्राणी संघ | 3. पोर्तुगीज मॅन ऑफ वॉर |
| **D.** मृदुकाय प्राणी संघ | 4. गोगलगाय |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (a) | 1 | 2 | 3 | 4 |
| (b) | 2 | 4 | 3 | 1 |
| (c) | 2 | 3 | 1 | 4 |
| (d) | 3 | 2 | 1 | 4 |

**Q15.** दिलेल्या वर्णनावरून वनस्पती विभाग ओळखा .

- ओल्या मातीत वाढतात.

- रचना चपटी व लांब असून पानांसारखी असते.

- यांना वनस्पती सृष्टीचे उभयचर म्हटले जाते

(a) थॅलोफायटा

(b) ब्रायोफायटा

(c) टेरिडोफायटा

(d) अँजिओस्पर्म

**Q16.** अपवर्तनांक काढण्याचे योग्य सूत्र ओळखा.

(a) ∠i / ∠r
(b) Sin i / Sin r
(c) ∠r / ∠i
(d) Sin r / Sin i

**Q17.** खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.

**A.** आयनिक संयुगांचे द्रावणांक व उत्कलनांक उच्च असतात.
**B.** वितळलेल्या व द्रावण स्थितीत आयनिक संयुगे विद्युत वाहक नसतात.

(a) फक्त A योग्य
(b) फक्त B योग्य
(c) दोन्ही योग्य
(d) एकही योग्य नाही

**Q18.** योग्य जोड्या लावा.

| | |
|---|---|
| **A.** ईथेन | 1. C2H6 |
| **B.** ब्युटेन | 2. C4 H10 |
| **C.** प्रोपेनॉल | 3. C3H8O |
| **D.** पेन्टिन | 4. C5H10 |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (a) | 1 | 4 | 3 | 2 |
| (b) | 1 | 2 | 3 | 4 |
| (c) | 4 | 2 | 3 | 1 |
| (d) | 1 | 3 | 2 | 4 |

**Q19.** पुढीलपैकी कोणत्या ठिकाणी गुरुत्व त्वरणाचे मूल्य सर्वात कमी असेल?

(a) पृथ्वीचा पृष्ठभाग
(b) माउंट एव्हरेस्ट
(c) अंतराळयानाची कक्षा
(d) दळणवळण उपग्रहाची कक्षा

**Q20.** आधुनिक आवर्त सारणीत कोणत्या गणात हॅलोजन कुलाचे सदस्य आहेत?

(a) 15
(b) 16
(c) 17
(d) 18

**Q21.** खालीलपैकी योग्य विधाने ओळखा .

**A.** महाराष्ट्र राज्याचा रेखावृत्तीय विस्तार 72 अंश 76 मिनिट पूर्व ते 81 अंश 54 मिनिट पूर्व असा आहे.
**B.** महाराष्ट्राची पूर्व पश्चिम लांबी 720 किमी आहे.

(a) A योग्य
(b) B योग्य
(c) AB योग्य
(d) दोन्ही अयोग्य

**Q22.** सिंधुदुर्ग जिल्ह्याची निर्मिती झाली त्यावेळेस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कोण होते?

(a) शंकरदादा चव्हाण
(b) बाबासाहेब भोसले
(c) ए. आर. अंतुले
(d) शरद पवार

**Q23.** जोड्या लावा.

| **विभाग** | **सर्वात दक्षिणेकडील तालुके** |
|---|---|
| **A.** पुणें | 1. उमरगा |
| **B.** नागपूर | 2. चंदगड |
| **C.** औरंगाबाद | 3. सिरोंचा |
| **D.** अमरावती | 4. उमरखेड |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (a) | 1 | 2 | 3 | 4 |
| (b) | 2 | 3 | 1 | 4 |
| (c) | 2 | 3 | 4 | 1 |
| (d) | 1 | 3 | 4 | 2 |

**Q24.** दिलेल्या पर्यायातील सर्वात कमी उंचीचे शिखर ओळखा.

(a) त्र्यंबकेश्वर
(b) तौला
(c) चिखलदरा
(d) हनुमान

**Q25.** फिट्स जिराल्डा हा घाट कोणत्या मार्गावर आहे?

(a) सातारा - रत्नागिरी
(b) कोल्हापूर - कुडाळ
(c) महाबळेश्वर - अलिबाग
(d) पुणे - महाड

**Q26.** दिलेल्या वैशिष्ट्यांवरून खडक प्रणाली ओळखा .
**A.** दक्खनचा पायाभूत खडक
**B.** ग्रॅनाईट, शिस्ट, निस हे प्रमुख खडक
**C.** चंद्रपूर व गडचिरोलीच्या बऱ्याच भागात आढळतो.
(a) धारवाड
(b) कडाप्पा
(c) विंध्यन
(d) आर्कियन

**Q27.** भीमा,मुळा आणि मुठा या नद्यांचा संगम कोणत्या ठिकाणी होतो?
(a) रांजणगाव
(b) शिरूर
(c) पुणे
(d) पिंपळगाव

**Q28.** डिंभे धरण कोणत्या नदीवर बांधलेले आहे?
(a) कुकडी
(b) भीमा
(c) घोड
(d) इंद्रायणी

**Q29.** योग्य विधाने निवडा .
**A.** वर्षातील सर्वात मोठ्या दिवसाचा कालवधी 13 तास 13 मिनिटे असतो.
**B.** वर्षातील सर्वात मोठा दिवस उत्तर गोलार्धात 21 जून रोजी तर दक्षिण गोलार्धात 23 सप्टेंबर रोजी असतो.
(a) A बरोबर B चूक
(b) B बरोबर A चूक
(c) दोन्ही बरोबर
(d) दोन्ही चूक




**Q30.** खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा.
**A.** भूखंड वहनाची संकल्पना वेबर यांनी मांडली
**B.** भूरूप चक्राची संकल्पना डेव्हिस यांनी मांडली
**C.** भूपट्ट विवर्तनिकी सिद्धांत मॉर्गन यांनी मांडला.
(a) फक्त A
(b) फक्त B
(c) फक्त C
(d) सर्व चूक

**Q31.** आंतरिक गाभा व बाह्य गाभा यांच्यातील विलगता ओळखा
(a) लेहमन
(b) गटेनबर्ग
(c) मोहो
(d) कॉनरॅड

**Q32.** योग्य विधान ओळखा
**A.** भारताचा अक्षवृत्तीय विस्तार साधारण 32 अंश आहे.
**B.** भारताचा रेखावृत्तीय विस्तार साधारण 29 अंश आहे
(a) A बरोबर B चूक
(b) B बरोबर A चूक
(c) दोन्ही बरोबर
(d) दोन्ही चूक

**Q33.** खालीलपैकी कोणत्या राज्यातून कर्कवृत्त आणि भारतीय प्रमाणवेळ रेखावृत्त जाते.
(a) मध्यप्रदेश आणि झारखंड
(b) मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ
(c) मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश
(d) छत्तीसगढ आणि ओरिसा

**Q34.** योग्य विधाने निवडा .
**A.** कैमूर टेकड्या सातपुडा पर्वतात आहेत.
**B.** मैकल टेकड्या विंध्य पर्वतात आहेत.
(a) A बरोबर
(b) B बरोबर
(c) दोन्ही बरोबर
(d) दोन्ही चूक

**Q35.** योग्य विधाने ओळखा .

**A.** गिर, देवणी या गायीच्या प्रजाती आहेत.

**B.** जमुनापारी, उस्मानाबादी या शेळीच्या प्रजाती आहेत

(a) A बरोबर

(b) B बरोबर

(c) दोन्ही बरोबर

(d) दोन्ही चूक

**Q36.** 1919 च्या कायद्याने हाय कमिशनर किंवा भारतीय उच्चयुक्त हे नवीन पद निर्माण केले. या पदावर नियुक्त झालेली पहिली व्यक्ती कोण?

(a) भूपेंद्रनाथ बसू

(b) विल्यम मेयर

(c) लॉर्ड मोर्ले

(d) सर सायमन

**Q37.** पुढीलपैकी कोठे ब्रिटिशांनी रयतवारी महसूल पद्धत लागू केली नाही?

(a) अवध

(b) आसाम

(c) मुंबई

(d) मद्रास

**Q38.** कोणत्या गव्हर्नर जनरल ने ठगांचा बंदोबस्त करण्यासाठी कर्नल विल्यम स्लीमन यास नेमले?

(a) लॉर्ड डलहौसी

(b) लॉर्ड विल्यम बेंटिंग

(c) लॉर्ड कॉर्नवॉलिस

(d) लॉर्ड माउंटबॅटन

**Q39.** इ. स. 1904 मध्ये पुढीलपैकी कोणता कायदा झाला नाही?

(a) भारतीय विद्यापीठ कायदा

(b) कलकत्ता कॉर्पोरेशन ऍक्ट

(c) सहकारी पतसंस्था कायदा

(d) प्राचीन स्मारकांचा कायदा

**Q40.** योग्य जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| **A.** प्रॉब्लेम ऑफ द ईस्ट | 1. लोकमान्य टिळक |
| **B.** ओरायन | 2. कृष्णाजी खाडिलकर |
| **C.** डोंगरीच्या तुरुंगातील आमचे 101 दिवस | 3. लॉर्ड कर्झन |
| **D.** किचकवध | 4. गो. ग. आगरकर |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (a) | 4 | 3 | 1 | 2 |
| (b) | 4 | 1 | 2 | 3 |
| (c) | 3 | 1 | 4 | 2 |
| (d) | 3 | 4 | 1 | 2 |

**Q41.** पुढीलपैकी कोणकोणती नियत कालिके डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केली?

**A.** मूकनायक

**B.** समता

**C.** बहिष्कृत भारत

(a) फक्त A

(b) AB

(c) BC

(d) ABC

**Q42.** अखिल भारतीय किसान काँग्रेस ची स्थापना ___ साली झाली.

(a) 1920

(b) 1928

(c) 1936

(d) 1940

**Q43.** कायदेभंगाच्या चळवळीत जिथे मिठागरे नव्हती तिथे जंगल सत्याग्रह, झेंडा सत्याग्रह केले जात होते. महाराष्ट्रातील पुढीलपैकी कोणत्या ठिकाणी जंगल सत्याग्रह करण्यात आले?

(a) बिळाशी

(b) पुसद

(c) संगमनेर

(d) वरीलपैकी सर्व

**Q44.** काँग्रेसच्या कराची अधिवेशनात राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रम मांडण्यात आला. या अधिवेशनाचे अध्यक्ष कोण होते?
(a) पंडित जवाहरलाल नेहरू
(b) सरदार वल्लभ भाई पटेल
(c) सुभाषचंद्र बोस
(d) महात्मा गांधी

**Q45.** ब्राह्मो समाज ऑफ इंडिया ची स्थापना कोणी केली?
(a) राजा राम मोहन रॉय
(b) केशवचंद्र सेन
(c) देवेंद्रनाथ टागोर
(d) ईश्वरचंद्र विद्यासागर

**Q46.** राष्ट्रीय उत्पन्नाचा अंदाज ठरवताना " उत्पादन पद्धतीचा" वापर प्रामुख्याने कोणत्या क्षेत्रासाठी केला जातो?
(a) सेवा क्षेत्र
(b) चतुर्थक क्षेत्र
(c) कृषी व उद्योग क्षेत्र
(d) यापैकी नाही

**Q47.** भारताची 11 वि पंचवार्षिक योजना कोणत्या प्रतिमानावर आधारित होती?
(a) ब्रह्मानंद वकील
(b) PURA
(c) ॲलन मान अशोक रुद्र
(d) महालनोबीस

**Q48.** इंपिरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करून SBI बँकेत रूपांतर कोणत्या समितीच्या शिफारसी वरून केले?
(a) नरसिंहम समिती
(b) गोरवाला समिती
(c) शिवरामन समिती
(d) यापैकी नाही

**Q49.** स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजने मध्ये पुढीलपैकी कोणकोणत्या योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले?
**A.** गंगा कल्याण योजना GKY
**B.** एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम IRDP
**C.** दशलक्ष विहिरींची योजना MWS
**D.** ग्रामीण कारागिरांना सुधारित अवजारांचा पुरवठा SITRA
(a) A सोडून सर्व
(b) C सोडून सर्व
(c) D सोडून सर्व
(d) वरीलपैकी सर्व

**Q50.** एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम केव्हा सुरु करण्यात आला?
(a) 2 ऑक्टोबर 1984
(b) 2 ऑक्टोबर 1980
(c) 14 नोव्हेंबर 1984
(d) 14 नोव्हेंबर 1980
.

**Q51.** खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.
**A.** देशात सेवा कर 1 जुलै 1995 पासून लागू करण्यात आला.
**B.** 1 जुलै 2017 पासून सेवा कर GST मध्ये विलीन करण्यात आला आहे.
(a) फक्त A योग्य
(b) फक्त B योग्य
(c) दोन्ही योग्य
(d) दोन्ही अयोग्य



**Q52.** भारतात निर्यात प्रक्रिया प्रदेशाची ( EPZ ) सुरुवात कोणत्या वर्षी झाली?
(a) 1950
(b) 1955
(c) 1965
(d) 1975

**Q53.**
**A.** UPS नुसार सर्वेक्षण पूर्व तीस दिवसात कोणत्याही दुय्यम आर्थिक कृतीत गुंतलेले असल्यास त्यांना दुय्यम दर्जावर रोजगारीत असल्याचे मानले जाते.
**B.** CDS आधारावर रोजगारीत समजण्यासाठी व्यक्तीने सर्वेक्षणाच्या आठवड्यात दररोज किमान 5 तास काम करणे अपेक्षित आहे.
**C.** CWS आधारावर रोजगारात समजण्यासाठी सर्वेक्षण पूर्व आठवड्यात कोणत्याही दोन दिवसात किमान दोन तास काम करणे आवश्यक आहे.
वरीलपैकी योग्य विधाने ओळखा
(a) फक्त A
(b) A आणि B
(c) BC
(d) ABC

**Q54.** योग्य विधाने ओळखा.
**A.** लोकसंख्या संक्रमण सिद्धांताच्या दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या वाढीचा दर स्थिर असतो.
**B.** भारताने 1951 नंतर लोकसंख्या संक्रमण सिद्धांताच्या दुसऱ्या अवस्थेत प्रवेश केला
(a) फक्त A
(b) फक्त B
(c) दोन्ही
(d) एकही नाही

**Q55.** रिझर्व्ह बँकेने रोख राखीव प्रमाण CRR वाढविले तर खालीलपैकी कोणता परिणाम होईल?
**A.** कर्जे स्वस्त होऊन गुंतवणूक वाढेल
**B.** चलनवाढ आटोक्यात येईल
**C.** रोजगारात घट होईल
(a) AC
(b) AB
(c) BC
(d) ABC

**Q56.** खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा.
**A.** संविधान सभेच्या सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते.
**B.** मूलभूत हक्क उपसमितीची अध्यक्ष एच. सी. मुखर्जी होते.
**C.** सर्वोच्च न्यायालय संबंधी समितीचे अध्यक्ष एस. वरदाचारी होते.
(a) फक्त A अयोग्य
(b) फक्त B अयोग्य
(c) फक्त C अयोग्य
(d) सर्व अयोग्य

**Q57.** योग्य विधान ओळखा .
(a) जानेवारी 1949 मध्ये घटना समितीने भारताच्या राष्ट्रकुलाच्या सदस्यत्वास मान्यता दिली.
(b) 24 जुलै 1947 रोजी घटना समितीने राष्ट्रध्वज स्वीकारला
(c) 26 जानेवारी 1949 रोजी घटना समितीने राष्ट्र गीताचा स्वीकार केला.
(d) 24 जानेवारी 1950 रोजी घटना समितीने डॉ. राजेंद्र प्रसाद यांची भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड केली.

**Q58.** जोड्या लावा.

| | |
|---|---|
| **A.** ऑस्ट्रेलियाची राज्यघटना | 1. आणीबाणी दरम्यान मूलभूत हक्क स्थगित होणे. |
| **B.** दक्षिण आफ्रिकेची राज्यघटना | 2. समवर्ती सूची |
| **C.** जपानची राज्यघटना | 3. घटना दुरुस्ती ची पद्धत |
| **D.** जर्मनी ची राज्यघटना | 4. कायद्याने प्रस्थापित राज्य |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (a) | 1 | 2 | 3 | 4 |
| (b) | 2 | 4 | 3 | 1 |
| (c) | 2 | 3 | 4 | 1 |
| (d) | 3 | 2 | 1 | 4 |

**Q59.** " भारतीय संघराज्य हे सहकारी स्वरूपाचे संघराज्य आहे " हे विधान कोणी केले.
(a) मॉरिस जोन्स
(b) पॉल ॲपलबी
(c) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(d) ग्रॅनव्हिल ऑस्टिन

**Q60.** जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण या हक्कामध्ये खालीलपैकी कशाचा समावेश होत नाही?

(a) संपाचा हक्क

(b) परदेश गमन करण्याचा हक्क

(c) खासगी पणाचा हक्क

(d) प्रदूषणमुक्त व चांगल्या पर्यावरणाचा हक्क

**Q61.** डॉ. बी. आर. आंबेडकरांनी कोणत्या अनुच्छेदाचे वर्णन संविधानाचा आत्मा आणि हृदय असे केले आहे?

(a) कलम 14

(b) कलम 19

(c) कलम 21

(d) कलम 32

**Q62.** जोड्या लावा

| | |
|---|---|
| **A.** कलम 39 | 1. कामाच्या ठिकाणी न्यायचे व मानवीय परिस्थिती आणि प्रसूती सहाय्य |
| **B.** कलम 40 | 2. कामाचा आणि शिक्षणाचा हक्क आणि विविक्षित बाबतीत सरकारचे सहाय्य |
| **C.** कलम 41 | 3. ग्रामपंचायतीचे संवर्धन |
| **D.** कलम 42 | 4. राज्याने अनुसरण करण्याची काही तत्त्वे |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (a) | 1 | 2 | 3 | 4 |
| (b) | 4 | 3 | 2 | 1 |
| (c) | 4 | 2 | 3 | 1 |
| (d) | 3 | 2 | 1 | 4 |




**Q63.** भारतीय संविधान वगळता पुढीलपैकी कोणत्या लोकशाही आधारित देशाच्या संविधानात मूलभूत कर्तव्ये आढळतात?

(a) ब्रिटन

(b) जपान

(c) अमेरिका

(d) यापैकी नाही

**Q64.** योग्य विधाने ओळखा.

**A.** भारताचे राष्ट्रपती आपला राजीनामा सर न्यायाधीशांना उद्देशून देतात.

**B.** भारताचे उपराष्ट्रपती त्यांचा राजीनामा राष्ट्रपतींना संबोधून देतात.

(a) फक्त A

(b) फक्त B

(c) दोन्ही योग्य

(d) दोन्ही अयोग्य

**Q65.** राष्ट्रपतिंवर महाभियोग खालीलपैकी कोणत्या कलमाद्वारे चालविला जातो?

(a) कलम 60

(b) कलम 62

(c) कलम 61

(d) कलम 63

**Q66.** खालील राज्यांचा राज्यसभेतील जागांनुसार चढता क्रम लावा.

**A.** छत्तीसगढ

**B.** केरळ

**C.** मध्य प्रदेश

**D.** पश्चिम बंगाल

(a) A → B → C → D

(b) A → C → B → D

(c) C → B → A → D

(d) C → A → B → D

**Q67.** केंद्र सरकारने केंद्र - राज्य संबंध संदर्भात सरकारिया आयोगाची स्थापना कोणत्या वर्षी केली?
(a) 1981
(b) 1983
(c) 1991
(d) 1993

**Q68.** खालीलपैकी योग्य विधान ओळखा
**A.** संविधानाच्या अनुच्छेद 74 नुसार मंत्री परिषद लोकसभेला उत्तरदायी असते.
**B.** संविधानाच्या अनुच्छेद 75 नुसार मंत्री परिषद संसदेला उत्तरदायी असते.
**C.** संविधानाच्या अनुच्छेद 75 नुसार व्यक्तिगत मंत्री राष्ट्रपतीला उत्तरदायी असतो.
(a) AC
(b) BC
(c) फक्त C योग्य
(d) ABC

**Q69.** योग्य विधाने ओळखा.
**A.** अनुच्छेद 163 नुसार राज्यपालांना विशिष्ट गोष्टींबाबत विवेकाधिकार प्राप्त झाले आहेत.
**B.** अनुच्छेद 167 नुसार राज्याच्या प्रश्नासंबंधी मंत्रिपरिषदेचे सर्व निर्णय मुख्यमंत्र्यांनी राज्यपालास कळवणे बंधनकारक आहे.
**C.** अनुच्छेद 165 नुसार मंत्रिपरिषद राज्याच्या विधानसभेस सामुदायिकरीत्या जबाबदार असेल.
(a) AC
(b) AB
(c) फक्त C योग्य
(d) ABC

**Q70.** खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.
**A.** जनहित याचिका हि संकल्पना एक्शीओ पॉप्युलरीस या तत्त्वावरून आली.
**B.** जनहित याचिकेचा उगम ब्रिटन मध्ये झाला.
**C.** न्यायमूर्ती भगवती यांना भारतातील जनहित याचिकेचे जनक मानण्यात येते.
(a) AC
(b) AB
(c) BC
(d) ABC

**Q71.** ऑक्टोबर 2021 मध्ये कोंकणशक्ती युद्धसराव कोणत्या दोन देशांमध्ये पार पडला?
(a) भारत आणि रशिया
(b) भारत आणि श्रीलंका
(c) भारत आणि अमेरिका
(d) भारत आणि ब्रिटन

**Q72.** योग्य जोड्या जुळवा
**A.** शिवराजपूर 1. दिव
**B.** घोघाळ 2. गुजरात
**C.** उषीकोंडा 3. अंदमान व निकोबार
**D.** राधानगर 4. आंध्रप्रदेश

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (a) | 2 | 4 | 1 | 3 |
| (b) | 4 | 3 | 2 | 1 |
| (c) | 4 | 2 | 3 | 1 |
| (d) | 2 | 1 | 4 | 3 |

**Q73.** राष्ट्रीय गंगा नदी डॉल्फिन दिन केव्हा साजरा करण्यात येतो?
(a) 5 ऑक्टोबर
(b) 10 सप्टेंबर
(c) 5 सप्टेंबर
(d) 10 ऑक्टोबर

**Q74.** कोरोना महामारीशी मुकाबला करण्यासाठी कोणत्या राज्याने मिशन कवच कुंडल अभियान राबविले?
(a) उत्तर प्रदेश
(b) मध्य प्रदेश
(c) गोवा
(d) यापैकी नाही

**Q75.** खालीलपैकी योग्य विधाने ओळखा
**A.** जागतिक लोकशाही निर्देशांक इकॉनॉमिस्ट इंटेलिजन्स युनिट ने जाहीर केला आहे
**B.** 2020 मध्ये या निर्देशांकात भारताचा क्रमांक 63 वा होता
(a) केवळ A योग्य
(b) केवळ B योग्य
(c) दोन्ही योग्य
(d) दोन्ही अयोग्य

**Q76.** खालीलपैकी कोणत्या शहराने 2021 सालच्या ईझ ऑफ लिव्हिंग इंडेक्समध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे?
(a) बेंगळूरू
(b) पुणे
(c) मुंबई
(d) नवी मुंबई

**Q77.** खालीलपैकी कोणत्या राज्याने नुकतीच 'काला नमक तांदुळाची' सिंगापूरला निर्यात करण्यास परवानगी दिली?
(a) मध्य प्रदेश
(b) हिमाचल प्रदेश
(c) उत्तर प्रदेश
(d) छत्तिसगढ

**Q78.** महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा कोण आहेत?
(a) मीनाक्षी मित्रा
(b) रुपाली चाकणकर
(c) नीलिमा सानप
(d) मृणालिनी फडणवीस

**Q79.** खालीलपैकी योग्य विधाने निवडा
**A.** 17 व्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तृणमूल कॉंग्रेसला 203 जागा मिळाल्या
**B.** याच निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला 10 जागा मिळाल्या
(a) केवळ A योग्य
(b) केवळ B योग्य
(c) दोन्ही योग्य
(d) एकही योग्य नाही

**Q80.** वर्ष 2021 मध्ये देशातील पहिले 'वॉटर प्लस' शहर होण्याचा मान कोणत्या शहराला मिळाला आहे?
(a) इंदोर
(b) भोपाळ
(c) नवी मुंबई
(d) अहमदाबाद

**Q81.** खालीलपैकी योग्य विधाने ओळखा
**A.** द. मा. मिरासदार यांनी व्यंकूची शिकवणी, माझ्या बापाची पेंड इत्यादी पुस्तकांचे लेखन केले.
**B.** पुस्तक लेखनाबरोबरच त्यांनी अनेक चित्रपटांचे पटकथा लेखन देखील केले आहे.
**C.** मराठीतील गाजलेला सिनेमा दुनियादारी त्यांच्या त्याच नावाच्या पुस्तकावर आधारित आहे
(a) सर्व योग्य
(b) फक्त a आणि b योग्य
(c) फक्त b आणि c योग्य
(d) फक्त a आणि c योग्य

**Q82.** सिन्हराज अधाना खालीलपैकी कोणत्या खेळाशी निगडीत आहे?
(a) भालाफेक
(b) नेमबाजी
(c) उंच उडी
(d) लांब उडी

**Q83.** खालीलपैकी कोणती चक्रीवादळे भारतीय किनारपट्टीवर सन 2020 मध्ये धडकली आहेत?
**A.** अम्फान
**B.** निसर्ग
**C.** बुलबुल
**D.** तौक्ते
(a) वरीलपैकी सर्व
(b) फक्त a आणि b
(c) फक्त b आणि c
(d) फक्त b आणि d

**Q84.** खालीलपैकी कोणत्या राज्यात हत्ती राखीव क्षेत्र नाही
(a) ओडिशा
(b) केरळ
(c) आसाम
(d) महाराष्ट्र

**Q85.** खालीलपैकी कोणता देश क्वाड मध्ये समाविष्ट नाही
(a) ऑस्ट्रेलिया
(b) रशिया
(c) अमेरिका
(d) जपान

**Q86.** आभासने 12 तासात एक अंतर पूर्ण केले.दोन वेगळ्या वाहनातून त्याने प्रत्येकी 6 तास प्रवास केला. त्याने पूर्वार्ध 15 किमी/तासाच्या वेगाने आणि उत्तरार्ध 45 किमी/तासाच्या वेगाने पूर्ण केला. आभासने दौऱ्यादरम्यान एकूण किती अंतर पार केले?

(a) 300 किमी
(b) 320 किमी
(c) 340 किमी
(d) 360 किमी

**Q87.** दिलेल्या संख्या मालिकेतील चुकीचे पद ओळखा
5 7.5 10 12.5 15 20 22.5

(a) 10
(b) 12.5
(c) 15
(d) 20

**Q88.** जर अजय आणि अतुल यांच्या गुणांची सरासरी 20 आहे. अतुल आणि सलील यांच्या गुणांची सरासरी 25 आहे. अजय, अतुल आणि सलील यांच्या गुणांची सरासरी 23 आहे तर अजय आणि सलील यांच्या गुणांची सरासरी किती?

(a) 22
(b) 23
(c) 24
(d) 25

**Q89.** पहिल्या दोन संख्यांमध्ये जो संबंध आहे तोच संबंध तिसऱ्या व चौथ्या संख्येत आहे. योग्य संबंध ओळखून चौथी संख्या ओळखा
68 : 20 :: 130 : ___?

(a) 20
(b) 30
(c) 40
(d) 50

**Q90.** जर
AG : 16 : : BH :_____?

(a) 18
(b) 20
(c) 22
(d) 24

**Q91.** जर तीन मुलांच्या वयाचे गुणोत्तर 3:6:8 आहे आणि 8 वर्षांपूर्वी त्यांच्या वयाची बेरिज 61 होती तर त्यांच्या आजच्या वयाची बेरीज किती?

(a) 80
(b) 85
(c) 90
(d) 95

**Q92.** खालील विधाने काळजीपूर्वक वाचा आणि दिलेली माहिती गृहीत धरून योग्य उत्तर द्या
1. सर्व आंबे पेरू आहेत
2. काही पेरू चिकू आहेत
3. एकही चिकू सफरचंद नाही
तर;
**A.** काही चिकू आंबे आहेत
**B.** काही पेरू सफरचंद नाहीत
**C.** काही आंबे सफरचंद नाहीत

(a) फक्त A आणि B योग्य
(b) फक्त B आणि C योग्य
(c) फक्त B योग्य
(d) फक्त A आणि C योग्य

**Q93.** जर
M % N याचा अर्थ M हा N चा भाऊ आहे
M @ N याचा अर्थ M ही N ची बहिण आहे
M $ N याचा अर्थ M ही N ची आई आहे
तर खालीलपैकी कोणता पर्यायानुसार A ही C ची आई आहे

(a) A % B @ C
(b) B % A $ C
(c) C @ B % A
(d) C $ B % A



**Q93.** चौकटीत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणता अंक येईल?

| | | |
|---|---|---|
| 8 | 12 | 20 |
| 6 | 9 | 15 |
| 4 | 6 | ? |
| 2 | 3 | 5 |

(a) 8
(b) 9
(c) 10
(d) 11

**Q94.** पुढील वर्णमालेतील शेवटचा भाग ओळखा
ABC, XWV, EFG, ?
(a) UTS
(b) TSR
(c) SRQ
(d) HIJ

**Q95.** जर A, B, C, D, E, F, G, H हे एका वर्तुळाकार टेबलाभोवती बसलेले आहेत. A हा H च्या विरुद्ध बाजूला आणि G च्या उजवीकडे दुसऱ्या स्थानावर आहे. C हा A च्या लगेच उजवीकडे बसला असून D च्या विरुद्ध बाजूला आहे. F हा G च्या डावीकडे तिसऱ्या स्थाबावर असून E च्या विरुद्ध बाजूला आहे. तर B च्या विरुद्ध बाजूस कोण बसले आहे?
(a) D
(b) G
(c) E
(d) A

**Q96.** जर अमित आणि भूषण एक काम 8 दिवसात पूर्ण करतात. अमित, भूषण आणि चिन्मय तेच काम 6 दिवसात पूर्ण करतात आणि भूषण आणि चिन्मय तेच काम 12 दिवसात पूर्ण करतात तर अमित आणि चिन्मय ते काम किती दिवसात पूर्ण करतील?
(a) 5
(b) 6
(c) 8
(d) 10

**Q97.** प्रश्न चिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?
2 3 10 15 ?
(a) 26
(b) 24
(c) 16
(d) 14

**Q98.** हर्षल आणि कुणाल दोघेही त्यांच्या कार्यालायपासून एकमेकांच्या विरुद्ध दिशेने चालत गेले. दोघेही 4 किलोमीटर चालले व आपल्या डावीकडे वळले. हर्षल 2 किलोमीटर चालून घरी पोहोचला तर कुणाल 4 किलोमीटर चालून घरी पोहोचला. तर त्यांच्या घरातील अंतर किती?
(a) 11
(b) 10
(c) 11.5
(d) 10.5

**Q99.** फोटोतल्या व्यक्तीकडे बोट दाखवून झेलम म्हणाली “ही माझ्या सासऱ्याच्या मुलीच्या एकुलत्या एक भावाची सासू आहे “तर फोटोतील व्यक्ती झेलामची कोण आहे?
(a) वहिनी
(b) आई
(c) मुलगी
(d) काकू

**Q100.** आज वार गुरुवार आहे. विनोदने आज कोव्हाक्सीन लस घेतली त्याला पुढल्या डोस साठो 28 दिवसांनी बोलावलं आहे. तो बरोबर सांगितलेल्या दिवशी गेला तर कोणता वार असेल?
(a) गुरुवार
(b) बुधवार
(c) सोमवार
(d) रविवार

## SOLUTIONS

**S1. Ans.(d)**
**Sol.** ट्रिटियम मध्ये एक प्रोटॉन व दोन न्यूट्रॉन असतात.
ट्रिटियम हे हायड्रोजनचे किरणोत्सारी समस्थानिक आहे

**S2. Ans.(a)**
**Sol.** इका बोरॉन - स्कॅनडियम
इका अल्युमिनियम - गॅलियम
इका सिलिकॉन - जर्मेनियम

**S3. Ans.(a)**
**Sol.** 1000 वॅट = 1 युनिट
जानेवारीतील दिवस 31
प्रतिदिन 1 तास = 400 * 31 = 12400वॅट = 12. 4 युनिट
खर्च 4 रुपये प्रति युनिट
4 x 12. 4 = 49. 6 रुपये

**S4. Ans.(d)**
**Sol.** झेप्टो म्हणजे $10^{-21}$
झेट्टो म्हणजे $10^{21}$
योक्टो म्हणजे $10^{-24}$
योट्टो म्हणजे $10^{24}$

**S5. Ans.(c)**
**Sol.** हर्शेल या वैज्ञानिकाने अवरक्त किरणांचा शोध लावला.

**S6. Ans.(c)**
**Sol.** केरळमधील कोट्टायम, अलापुझा आणि एर्नाकुलम या तीन जिल्ह्यात हा रोग आढळतो.
हा रोग क्युलेक्स डासामुळे होतो त्यामुळे पहिली दोन विधाने अयोग्य.

**S7. Ans.(a)**
**Sol.** थ्रॉम्बिन आणि फिब्रिनोजीन संयोग होऊन फायब्रिन तयार होते.

**S8. Ans.(b)**
**Sol.** सामान्यतः लाल रक्तपेशींचा आकार द्विअंतरवक्र (bio concave) असतो.

**S9. Ans.(b)**
**Sol.** कोळी श्वसन नलिकेद्वारे श्वसन करतो तर अळया, गांडूळ, बेडूक त्वचेद्वारे श्वसन करतात.

**S10. Ans.(d)**
**Sol.** हिपॅरिनमुळे शरीरात रक्त गोठत नाही

**S11. Ans.(c)**
**Sol.** कोपलँड या शास्त्रज्ञाने सजीवांचे चार प्रकारात वर्गीकरण केले. मोनेरा , प्रोटिस्टा , वनस्पती आणि प्राणी.

**S12. Ans.(c)**
**Sol.** व्हॉल्टर आणि सटन - नाकतोड्याच्या पेशीत जोड्याच्या स्वरूपात गुणसूत्रे सापडली.
एव्हरी आणि मॅक्लॉइड, मॅक कार्थी यांनी काही विषाणू वगळता सर्व सजीवांमध्ये DNA हीच सामग्री असते हे सिद्ध केले.

**S13. Ans.(a)**
**Sol.** एका शुक्राणूची लांबी 60 मायक्रोमीटर एवढी असते.
शुक्राणूला ऊर्जा पुरवण्यासाठी रेतामध्ये फ्रुक्टोज नावाची शर्करा असते.
एक शुक्राणू पुरुष प्रजनन संस्थेतून बाहेर पडताना 6. 5 मीटर अंतर कापतो.

**S14. Ans.(c)**
**Sol.** रंध्रीय प्राणी संघ → सायकॉन
निडारिया प्राणी संघ → पोर्तुगीज मॅन ऑफ वॉर
संधिपाद प्राणी संघ → फुलपाखरू
मृदुकाय प्राणी संघ → गोगलगाय



**S15. Ans.(b)**

**Sol.** वरील वैशिष्ट्ये ब्रायोफायटा ची आहेत.

**S16. Ans.(b)**

**Sol.** Sin i / Sin r = n

n या स्थिरांकास पहिल्या माध्यमाच्या संदर्भातील दुसऱ्या माध्यमाचा अपवर्तनांक म्हणतात. यालाच स्नेल चा नियम असे देखील म्हणतात.

**S17. Ans.(a)**

**Sol.** वितळलेल्या व द्रावण स्थितीत आयनिक संयुगे विद्युत वाहक असतात.

**S18. Ans.(b)**

**Sol.** ईथेन → $C_2H_6$

ब्युटेन → $C_4 H_{10}$

प्रोपेनॉल → $C_3H_8O$

पेन्टिन → $C_5H_{10}$

**S19. Ans.(d)**

**Sol.** दळणवळण उपग्रहाची उंची पृथ्वीच्या पृष्ठभागापासून साधारण 36000 किमी असल्याने त्यावरील गुरुत्वीकरणाचे मूल्य (g) सर्वात कमी अर्थात 0. 225 मीटर वर्ग असेल.

**S20. Ans.(c)**

**Sol.** फ्लोरिन, क्लोरीन, ब्रोमीन, आयोडीन हे हॅलोजन आहेत.

**S21. Ans.(d)**

**Sol.** महाराष्ट्र राज्याचा रेखावृत्तीय विस्तार 72 अंश 36 मिनिट पूर्व ते 80 अंश 54 मिनिट पूर्व असा आहे.

महाराष्ट्राची पूर्व पश्चिम लांबी 800 किमी आहे.

**S22. Ans.(c)**

**Sol.** 1 मे 1981 रोजी रत्नागिरी जिल्ह्यांमधून सिंधुदुर्गाची निर्मिती झाली.

**S23. Ans.(b)**

**Sol.** पुणें - चंदगड

नागपूर - सिरोंचा

औरंगाबाद - उमरगा

अमरावती - उमरखेड

**S24. Ans.(d)**

**Sol.** त्र्यंबकेश्वर 1304 मीटर - नाशिक जिल्हा

तौला - 1231 मीटर - नाशिक जिल्हा

चिखलदरा - 1118 मीटर - अमरावती जिल्हा

हनुमान - 1063 मीटर - धुळे जिल्हा

**S25. Ans.(c)**

**Sol.** फिट्स जिराल्डा घाट महाबळेश्वर - अलिबाग मार्गावर आहे.

**S26. Ans.(d)**

**Sol.** आर्कियन प्रणालीच्या खडकात वरील वैशिष्ट्ये आढळतात. त्यात मोठ्या प्रमाणात लोह खनिजाचे साठे आहेत.

**S27. Ans.(a)**

**Sol.** पुणे जिल्ह्यातील रांजणगाव येथे संगम होतो.

**S28. Ans.(c)**

**Sol.** आंबेगाव तालुक्यात घोड नदीवर डिंभे धरण आहे.

**S29. Ans.(a)**

**Sol.** वर्षातील सर्वात मोठा दिवस उत्तर गोलार्धात 21 जून रोजी तर दक्षिण गोलार्धात 22 डिसेंबर रोजी असतो.

**S30. Ans.(a)**

**Sol.** भूखंड वहनाची संकल्पना वेगनर यांनी मांडली

**S31. Ans.(a)**

**Sol.** लेहमन → आंतरिक गाभा व बाह्य गाभा

गटेनबर्ग → प्रावरण व गाभा

मोहो → सायमा व प्रावरण

कॉनरॅड → सियाल व सायमा

**S32. Ans.(b)**

**Sol.** भारताचा अक्षवृत्तीय विस्तार 8 अंश 4 मिनिट उत्तर ते 37 अंश 6 मिनिटे आहे. म्हणजे साधारण 29 अंश येतं

**S33. Ans.(b)**

**Sol.** कर्कवृत्त → गुजरात, राजस्थान, छत्तीसगढ, मध्य प्रदेश, झारखंड, पश्चिम बंगाल, त्रिपुरा मिझोराम या राज्यातून जाते.
प्रमाणवेळ रेखावृत्त → उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगढ , ओरिसा , आंध्र प्रदेश या राज्यातून जाते.

**S34. Ans.(d)**

**Sol.** कैमूर टेकड्या विंध्य पर्वतात आहेत.
मैकल टेकड्या सातपुडा पर्वतात आहेत.

**S35. Ans.(c)**

**Sol.** दोन्ही विधाने योग्य

**S36. Ans.(b)**

**Sol.** सर विल्यम मेयर यांची भारताच्या उच्चयुक्त पदी 6 वर्षांसाठी नेमणूक झाली.

**S37. Ans.(a)**

**Sol.** कायमधारा पद्धत - बंगाल, बिहार, ओरिसा
रयतवारी - आसाम , मुंबई, मद्रास
महालवारी - पंजाब, आग्रा, आवड, संयुक्त प्रांत

**S38. Ans.(b)**

**Sol.** लॉर्ड विल्यम बेटिंग (1828-35) याने 1829-30 दरम्यान ठगांचा बंदोबस्त केला. त्यासाठी कर्नल विल्यम स्लीमन यास नेमले

**S39. Ans.(b)**

**Sol.** कलकत्ता कॉर्पोरेशन ऍक्ट 1899 मध्ये आला

**S40. Ans.(c)**

**Sol.** प्रॉब्लेम ऑफ द ईस्ट → लॉर्ड कर्झन
ओरायन → लोकमान्य टिळक
डोंगरीच्या तुरुंगातील आमचे 101 दिवस → गो. ग. आगरकर
किचकवध → कृष्णाजी खाडिलकर

**S41. Ans.(d)**

**Sol.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक 1920 मध्ये , समता आणि बहिष्कृत भारत 1927 मध्ये सुरु केले.

**S42. Ans.(c)**

**Sol.** अखिल भारतीय किसान काँग्रेस ची स्थापना 1936 साली स्वामी सहजानंद सरस्वती यांच्या पुढाकाराने झाली.

**S43. Ans.(d)**

**Sol.** महाराष्ट्रात संगमनेर, कळवण, चिरनेर, बिळाशी, पुसद या ठिकाणी जंगल सत्याग्रह करण्यात आले.

**S44. Ans.(b)**

**Sol.** 1931 मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेसच्या कराची अधिवेशनात राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रम मांडण्यात आला.

**S45. Ans.(b)**

**Sol.** राजा राम मोहन रॉय - ब्राह्मो समाज
केशवचंद्र सेन - ब्राह्मो समाज ऑफ इंडिया
देवेंद्रनाथ टागोर - आदी ब्राह्मो समाज

**S46. Ans.(c)**

**Sol.** मोजमापाची प्रत्यक्ष पद्धत कृषी व उद्योग क्षेत्रासाठी वापरली जाते.
सेवा क्षेत्रासाठी उत्पन्न पद्धत या अप्रत्यक्ष पद्धतीचा वापर होतो

**S47. Ans.(b)**

**Sol.** 2007 ते 12 दरम्यान ची पंचवार्षिक योजना माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या PURA या संकल्पनेवर आधारित होती
(PURA – Providing Urban amenities to Rural Area)

**S48. Ans.(b)**

**Sol.** 1952 च्या गोरवाला समितीने इंपिरियल बँक आणि इतर बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा सल्ला दिला त्यानुसार 1955 मध्ये कायदा करून इंपिरियल बँकेचे रूपांतर SBI मध्ये झाले.

**S49. Ans.(d)**

**Sol.** 1999 मध्ये पुढील योजनांचे एकत्रीकरण करून स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना सुरु करण्यात आली.

गंगा कल्याण योजना GKY

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम IRDP

दशलक्ष विहिरींची योजना MWS

ग्रामीण कारागिरांना सुधारित अवजारांचा पुरवठा SITRA

स्वयंरोजगारासाठी ग्रामीण तरुणांना प्रशिक्षण TRYSEM

ग्रामीण क्षेत्रातील स्त्रिया व मुलांचा विकास DWCRA

**S50. Ans.(b)**

**Sol.** ही योजना 1999 मध्ये SJGSY मध्ये विलीन करण्यात आली

**S51. Ans.(b)**

**Sol.** देशात सेवा कर 1 जुलै 1994 पासून लागू करण्यात आला

**S52. Ans.(c)**

**Sol.** देशातील पहिला EPZ गुजरात मधील कांडला येथे सुरु झाला.

**S53. Ans.(a)**

**Sol.** CDS मध्ये दररोज किमान 4 तास काम करणे आवश्यक आहे.

CWS मध्ये संदर्भ आठवड्यात कोणत्याही एका दिवशी किमान एक तास काम करणे आवश्यक आहे.




**S54. Ans.(b)**

**Sol.** लोकसंख्या संक्रमण सिद्धांताच्या दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या वेगाने वाढते.

**S55. Ans.(c)**

**Sol.** कर्जे महाग होऊन गुंतवणूक कमी होईल

**S56. Ans.(b)**

**Sol.** मूलभूत हक्क उपसमितीची अध्यक्ष जे. बी. कृपलानी होते. एच. सी. मुखर्जी अल्पसंख्यांक उपसमितीचे अध्यक्ष होते.

**S57. Ans.(d)**

**Sol.** मे 1949 मध्ये घटना समितीने भारताच्या राष्ट्रकुलाच्या सदस्यत्वास मान्यता दिली.

22 जुलै 1947 रोजी घटना समितीने राष्ट्रध्वज स्वीकारला

24 जानेवारी 1950 रोजी घटना समितीने राष्ट्र गीताचा आणि राष्ट्र गानाचा स्वीकार केला.

**S58. Ans.(c)**

**Sol.**

ऑस्ट्रेलियाची राज्यघटना → समवर्ती सूची

दक्षिण आफ्रिकेची राज्यघटना → घटना दुरुस्ती ची पद्धत

जपानची राज्यघटना → कायद्याने प्रस्थापित राज्य

जर्मनी ची राज्यघटना → आणीबाणी दरम्यान मूलभूत हक्क स्थगित होणे.

**S59. Ans.(d)**

**Sol.** पॉल ऍपलबी - भारतीय व्यवस्था पूर्णपणे संघराज्य पद्धतीची आहे.

मॉरिस जोन्स - वाटाघाटीचे संघराज्य

**S60. Ans.(a)**

**Sol.** संपाचा हक्क मूलभूत हक्क कलाम 21 मध्ये समाविष्ट नाही

**S61. Ans.(d)**

**Sol.** कलम 32 - मूलभूत हक्कांच्या पायमल्ली विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा हक्क

**S62. Ans.(b)**

**Sol.** कलम 39 → राज्याने अनुसरण करण्याची काही तत्त्वे
कलम 40 → ग्रामपंचायतीचे संवर्धन
कलम 41 → कामाचा आणि शिक्षणाचा हक्क आणि विविक्षित बाबतीत सरकारचे सहाय्य
कलम 42 → कामाच्या ठिकाणी न्यायचे व मानवीय परिस्थिती आणि प्रसूती सहाय्य

**S63. Ans.(b)**

**Sol.** जपान च्या संविधानात, मुलभूत कर्तव्ये समाविष्ट आहेत

**S64. Ans.(b)**

**Sol.** भारताचे राष्ट्रपती आपला राजीनामा उपराष्ट्रपतींना उद्देशून देतात.

**S65. Ans.(c)**

**Sol.** महाभियोग प्रक्रिया अनुच्छेद 61 नुसार केली जाते

**S66. Ans.(a)**

**Sol.** छत्तीसगढ - 5 जागा
केरळ - 9 जागा
मध्य प्रदेश - 11 जागा
पश्चिम बंगाल - 16 जागा
महाराष्ट्र - 19 जागा

**S67. Ans.(b)**

**Sol.** 1983 - सरकारिया आयोग
2007 - पुंछी आयोग

**S68. Ans.(c)**

**Sol.** संविधानाच्या अनुच्छेद 75 नुसार मंत्री परिषद लोकसभेला उत्तरदायी असते.
मंत्री परिषद संसदेला उत्तरदायी नसते.

**S69. Ans.(b)**

**Sol.** अनुच्छेद 164 नुसार मंत्रिपरिषद राज्याच्या विधानसभेस सामुदायिकरीत्या जबाबदार असेल.

**S70. Ans.(a)**

जनहित याचिकेचा उगम अमेरिकेमध्ये झाला

**S71. Ans.(d)**

**Sol.** कोंकणशक्ती युद्धसराव – भारत आणि ब्रिटन

**S72. Ans.(d)**

**Sol.** ब्लू फ्लॅग प्रमाणपत्र मिळालेली किनारे आणि त्यांची राज्ये
शिवराजपूर → गुजरात
घोघाळ → दिव
उषीकोंडा → आंध्रप्रदेश
राधानगर → अंदमान व निकोबार

**S73. Ans.(a)**

**Sol.** 5 ऑक्टोबर → राष्ट्रीय गंगा नदी डॉल्फिन दिन (सुरुवात 2010)

**S74. Ans.(d)**

**Sol.** मिशन कवच कुंडल (महाराष्ट्र ने 8 ऑक्टोबर ते 14 ऑक्टोबर दरम्यान)

**S75. Ans.(a)**

**Sol.** 2020 मध्ये या निर्देशांकात भारताचा क्रमांक 53 वा होता

**S76. Ans.(a)**

**Sol.** हा निर्देशांक केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाने जाहीर केला आहे.
1. बेंगळूरू 2. पुणे 3. अहमदाबाद 4. चेन्नई

**S77. Ans.(c)**

**Sol.** या तांदळास बुद्ध तांदूळ किंवा बुद्ध का महाप्रसाद असे देखील म्हणतात

**S78. Ans.(b)**

**Sol.** रुपाली चाकणकर - महिला आयोगाच्या अध्यक्षा
मीनाक्षी मित्रा – मुख्य महालेखापाल
मृणालिनी फडणवीस – पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठाच्या कुलगुरू
नीलिमा सानप – राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्य (अध्यक्ष – न्या.आनंद निरगुडे)

**S79. Ans.(d)**
**Sol.** तृणमूल कॉंग्रेसला 213 जागा मिळाल्या
कॉंग्रेस ला 0 जागा मिळाल्या
भाजप ला 77 जागा मिळाल्या

**S80. Ans.(a)**
**Sol.** प्रत्येक थेंबाचे शास्त्रोक्त पद्धतीने वितरण आणि उच्च दर्जाचे रेन वॉटर हार्वेस्टिंग केले आहे

**S81. Ans.(b)**
**Sol.** गाजलेला चित्रपट – एक डाव भुताचा
दुनियादारी – सुहास शिरवळकर यांच्या पुस्तकावर आधारित

**S82. Ans.(b)**
**Sol.** पॅराऑलिम्पिक 2021 नेमबाजी स्पर्धेत कांस्यपदक जिंकले आहे

**S83. Ans.(b)**
**Sol.** बुलबुल – 2019 मध्ये, तौक्ते- 2021 मध्ये

**S84. Ans.(d)**
**Sol.** उर्वरित तीनही राज्यात हत्तींसाठी राखीव क्षेत्र आहेत

**S85. Ans.(b)**
क्वाड – भारत, ऑस्ट्रेलिया, अमेरिका आणि जपान

**S86. Ans.(d)**
**Sol.** एकूण कालावधी 12 तास ज्यामध्ये 6 तास 15 किलोमीटर प्रतितास वेगाने आणि 6 तास 45 किलोमीटर प्रतितास वेगाने प्रवास झाला.
अंतर = वेळ * वेग
पूर्वार्ध = 6*15=90
उत्तरार्ध = 6*45=270
90 + 270 = 360

**S87. Ans.(d)**
**Sol.** 5 x 1= 5
5 x 1.5 = 7
5 x 2 = 10
5 x 2.5 = 12.5


**S88. Ans.(c)**
**Sol.** अजय, अतुल आणि सलील यांचे एकूण गुण = 23 x 3 = 69
अतुल आणि सलील यांचे एकूण गुण = 25 x 2 = 50
अजय आणि अतुल यांचे एकूण गुण = 20 x 2 = 40
म्हणून अजय चे गुण = 19; अतुल चे गुण = 21; सलील चे गुण = 29
म्हणून अजय आणि सलील यांच्या गुणांची सरासरी = 24

**S89. Ans.(b)**
**Sol.** 43 + 4 = 68 53 + 5 = 130
42 + 4 = 20 52 + 5 = 30

**S90. Ans.(b)**
**Sol.** A = 1
G = 7
A + G = 8 → 8 x 2 = 16
म्हणून BH = 20

**S91. Ans.(b)**
**Sol.** जर त्याचं आताच वय x मानले तर
(3x – 8) + (6X- 8) + (8X – 8) = 61
x = 5
आजच्या वयाची बेरीज = 15 + 30 + 40 = 85

**S92. Ans.(c)**
**Sol.**




**S93. Ans.(b)**
**Sol.** B % A $ C = A ही C ची आई आहे हे सिद्ध होते


**S93. Ans.(c)**
**Sol.** 2 x 2; 2 x 3; 2 x 4
5 x 2 = 10

**S94. Ans.(b)**

**Sol.** ABC नंतर C च्या खालचं अक्षर पकडून पुढील तीन अक्षरे याप्रमाणे

**S95. Ans.(b)**

**Sol.**




**S96. Ans.(c)**

**Sol.** अमित भूषण आणि चिन्मय एका दिवसात 1/6 काम करतात

अमित आणि भूषण एका दिवसात 1/8 काम करतात

भूषण आणि चिन्मय एका दिवसात 1/12 काम करतात

तर, अमित आणि चिन्मय चे एका दिवसाचे काम

(2 x 1/6) – (1/8 + 1/12)

= 3/24


= 1/8

**S97. Ans.(a)**

**Sol.** $1^2 + 1;\ 2^2 - 1; \ldots 5^2 + 1$

**S98. Ans.(b)**

**Sol.**




**S99. Ans.(b)**

**Sol.** झेलमच्या सासऱ्यांची मुलगी म्हणजे तिची नणंद नणंदेचा एकुलता एक भाऊ भणजे झेलामचा नवरा. त्याची सासू म्हणजे झेलामची आई

**S100. Ans.(a)**

**Sol.** 28 दिवसांनी पुन्हा तोच वार येईल म्हणून गुरुवार.

